# प्रकरण पाचवे

# उपसंहार

प्रकरण पाचवे

# उपसंहार

मानव अधिकाराची प्रस्थापना हा आधुनिक काळातील सर्वांत महत्वाचा विचार आहे. मानवाला सन्मानाने, प्रतिष्ठेने जीवंत रहाता येणे हा त्याचा मुलभूत हक्क आहे. भारतीय संविधानाने 'संधीची समानता' हे तत्व मान्य केले आहे. हे तत्व मान्य करुन मागासवर्गीयांचा यात अंतर्भूत शैक्षणिक अधिकार मान्य करण्यात आला आहे. हा अधिकार भारतीय समाजातील अस्पृश्य व पददलित समाजाला सहजणे मिळाला नाही, तर त्यासाठी अनेक समाजसुधारकांचे प्रयत्न कारणीभूत ठरले. त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

मानवी संस्कृतीचा प्रवास हा असभ्य, रानटी अवस्थेपासून सुसंस्कृतीकडे वाटचाल करणारा प्रवास आहे.या विकासाच्या मुळांशी 'ज्ञान'हे मुलभूत तत्व आहे. मानवी समाजाची उत्क्रांती होत असताना एका पीढीने मिळविलेले ज्ञान दुसऱ्या पीढीत संक्रमित होते. ज्ञानाच्या या संक्रमणालाच शिक्षण असे म्हणतात.भारतीय समाज व्यवस्थेत मात्र ज्ञान हे धर्मसत्तेच्या व त्यातून निर्माण झालेल्या वर्णव्यवस्थेच्या कोंडवाड्यात बंदिस्त राहिले. त्यामुळे बहुसंख्य समाज ज्ञाना पासून वंचित, पिढीत,अपमानीत,जीवनाप्रती उदासिन आणि आकांक्षा विरहित राहीला.यास सर्वांत महत्वाचे कारण म्हणजे उच्चभ्रू ब्राह्मणी धार्मिक तत्वज्ञानाने पददलित लोकांवरती केलेली जबरदस्ती. आपले वर्चस्व शुद्र वर्गावर ठेवण्यासाठी ब्राह्मणी तत्वज्ञानाने शिक्षण,संपत्ती संपादन,सत्ता व अधिकाराची पदे यापासून शूद्रांना परावृत्त केले.महिलांची गुलामगिरी आणि शोषण या व्यवस्थेत अभिप्रेत होते.

या मनूप्रणित प्रथा, परंपरा, रुढी, चालीरीती यात गुरफटलेल्या समाजव्यवस्थेवर आपल्या तत्वज्ञानाने गौतमबुद्ध यांनी हल्ला केला. त्यामुळे वर्णव्यवस्थेला प्रथम हादरा बसला. पारंपारिक ज्ञान संकल्पनेत परिवर्तन, ज्ञानसंक्रमण व संपादनाच्या जातीबद्ध रचनेवर आघात यामुळे तत्कालीन समाजजीवनात एक अभूतपूर्व क्रांती घडून आली. बौद्ध संघातून सर्व जातीधर्माचे लोक भिख्खू व भिख्खूनी म्हणून एकत्र आले. तक्षशिला,

नालंदा या विद्यापीठांतून वर्णवर्चस्ववाद व वैदिक मतांचे खंडन केले गेले. बौद्ध तत्वज्ञान लोकांच्या बोलीभाषेतून आल्याने ज्ञानाची दारे सर्वांसाठी खुली झाली. त्यामुळे वैदिक समाजव्यवस्थेतील पुरोहित वर्चस्ववादाविरूद्ध मोठा संघर्ष बौध्द काळात भारतात निर्माण झाला. शुद्र वर्गातील पुरुषाबरोबर संघातून प्रवेश मिळाल्याने स्त्रियांनाही आत्ममुक्तीची प्रेरणा मिळाली.

बौद्ध धर्माच्या ऱ्हासामुळे व वैदिक धर्माच्या पुर्नरुज्जीवनामुळे शुद्रांना अनेक शतके शिक्षणापासून वंचित रहावे लागले. १३ व्या शतकात मुस्लिमांची सत्ता भारतात स्थापन झाल्यानंतर मदरसा मधून मुस्लिम तर मंदिरातून उच्चवर्णिय ब्राम्हण शिक्षण घेत असत. शुद्रांना मंदिर प्रवेशाची परवानगीच नव्हती, त्यामुळे मध्ययुगीन भारतीय समाजात पुन्हा एकदा ज्ञानसत्ता व ज्ञानभाषा यावरती ब्राह्मणी वर्चस्व टिकून राहिले. या समाजव्यवस्थेला काही प्रमाणात मध्ययुगीन संतांनी आव्हान दिले असले तरी जातीयतेची पाळेमुळे उखडून टाकण्यात ते फारसे यशस्वी झाले नाहीत. पण शुद्रातीशुद्रांचे संघटन करुन मुस्लिम संस्कृती मध्येही हिंदुसंस्कृती टिकविण्यात मात्र ते यशस्वी झाले. या धार्मिक संक्रमणाच्या काळात शुद्रांचे शिक्षण हा विषय दुर्लक्षितच राहील.

मध्ययुगाच्या शेवटच्या पर्वात शिवशाहीनंतर महाराष्ट्रात पेशवे पुर्नस्थापित झाले. ब्राह्मणी वर्चस्वामुळे शुद्रातीशुद्रांवरील बंधने बळकट होऊन ते अस्पृश्य म्हणून गावकुसा बाहेर टाकले गेले. त्यांनी तत्कालीन बंधनात रहावे यासाठी कडक कायदे केले गेले.

अस्पृश्य समाजाला शिक्षण तर सोडाच पण इतर मानवी मूल्येही नाकारली गेली. ब्राम्हणांना सहस्त्रभोजने तर अस्पृश्यतेचे काटेकोरपालन यासाठी पेशवाई प्रसिद्ध झाली. ब्राह्मणशाहीच्या विळख्यात पेशवे इतके अडकले की, पानिपतच्या पराभवानंतर ते स्वतःच राजकीयदृष्ट्या सक्षम राहू शकले नाहीत. आपापसातील हेवेदावे आणि संघर्ष यामुळे १८१८ मध्ये ब्रिटिशांनी पेशवाईचा अस्त केला.

पेशवाई बुडाली तरी ब्राह्मणी धर्मसत्तेची पाळेमुळे समाजात खोलवर रुजली

होती. या सर्वस्वाला सुरुंग लावण्याचे काम फुलमाळी समाजात जन्मलेल्या महात्मा जोतिबा फुलेंनी पुण्यातूनच केले. ख्रिश्चन मिशनऱ्यांचा संपर्कामुळे शुद्रांचे अज्ञान व शिक्षणापासून फारकत ही मागासलेपणाची कारणमिमांसा त्यांनी आपल्या मांडणीतून केली. यासाठी समानता, ब्राह्मणेत्तरांचे शिक्षण या उद्दिष्टांनी सत्यशोधक समाजाची चळवळ १७७३ मध्ये पुण्यात चालू केली. यापूर्वीच आपल्या बरोबरीच्या लहूजी मांग व राणबा महार यासारख्या सहकाऱ्यांच्या मदतीन १८४८ मध्ये पत्नी सावित्रीबाईंच्या सहकार्याने पहिली मुलींची शाळा सुरु केली. पेशवे काळातील धर्म व समाजनीतीमुळे मागासलेपणाच्या गर्त्तेत दडपलेला शुद्रांतीशुद्र समाज म.फुलेंच्या कार्याकडे आशावादी दृष्टीने पाहू लागला.

याचवेळी शासनव्यवस्था भक्कम करण्यासाठी ब्रिटिशांना नोकरवर्गाची गरज भासू लागली होती. तर काही प्रमाणात शिक्षण घेतलेले उच्चवर्णियच या ब्रिटीशांच्या सेवेत रुजू होऊ लागले होते. ब्रिटिशांनी सर्वसामान्यांच्या हितासाठी शिक्षण द्यावे असे भारतीय सुधारकांना वाटत होते, तर ब्रिटीश उच्चभ्रू ब्राम्हणांना दुखवून मागासवर्गीयांना शिक्षण देण्यास धजत नव्हते. बहुजनांना शिक्षण मिळूच नये, यासाठी पुण्यामध्ये ब्राह्मण एकजुटीने प्रयत्न करीत त्यामुळे लॉर्ड मेकॉलेने ही फक्त काही लोकांना शिक्षण द्यावे व नंतर ते खालीपर्यंत झिरपेल तेव्हा बहुजन समाज शिकेल असा आशावाद मांडला. मेकॉलेच्या अहवालावरुन हे स्पष्ट होते की, संपूर्ण भारतीयांना शिक्षित करण्यापेक्षा उच्चवर्णिय ऐतद्देशीयांचा ब्रिटीश अभिरुची असणारा दुय्यम कारकूनांचा वर्ग त्यांना तयार करावयाचा होता. त्यांच्या या दूरदृष्टीमध्ये शतकानुशतके दडपलेल्या अस्पृश्य समाजाला कोठेच स्थान नव्हते.

ब्रिटीश राजवटीत राज्यकर्त्यांनी हा दृष्टीकोन ठेवला असला तरी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मात्र धर्म प्रसाराच्या हेतूंनी आरोग्यसेवा व शिक्षण हे सर्वांसाठी खुले केले. धर्मप्रचाराबरोबरच मिशनरी शाळांची स्थापना करुन पददलित समाजाशी नाते जोडण्याचे काम मिशनऱ्यांनी केले. मिशनरी अस्पृश्यांना शाळेत प्रवेश देऊन धर्मांतरांचे कार्य करीत होते. सरकार

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मिशनऱ्यांना आर्थिक मदत देत असे पण उच्चवर्णिय हिंदू लोक धर्मभ्रष्ट होईल या भितीने आपली मुले शाळेत पाठविणार नाहीत म्हणून अस्पृश्यांना शाळेत घेण्यासाठी धजत नव्हते. पेशवाई बुडाली असली तरी त्यांनी रुजविलेली मानसिकता लगेच बदलणार नव्हती. त्यामुळे ब्रिटीश सरकारही प्रस्थापित शिक्षण व्यवस्थेत बदल करण्याचे धाडस करीत नव्हते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुंबई इलाख्यातील धारवाड येथील सरकारी हायस्कूलमध्ये १८५६ च्या जूनमध्ये महार मुलांस प्रवेश देण्याविषयीच्या अर्जावर बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनी दिलेला निर्णय महत्वपूर्ण होता. सदर महार मुलगा शाळेत आल्यास हायस्कूल विटाळेल व वरिष्ठवर्गातील पालक मुलांना शाळेतून काढतील.सरकारबद्दल वरिष्ठ हिंदूचे मत वाईट होईल, त्यासाठी महार मुलाला प्रवेश नाकारावा. थोडक्यात उच्चवर्णियांसाठी अस्पृश्यांना शिक्षण नाकारणे हे सरकारचे सोयीस्कर धोरण होते. मिशनऱ्यांनी मात्र धर्मप्रसाराच्या अंतस्त हेतूने अस्पृश्य मुलाला शाळेत प्रवेश दिला. त्यामुळे बहुतांश अस्पृश्य हिंदू धर्मांतरीत झाले.

१८१३ सालच्या चार्टर ॲक्ट मधील शिक्षणासाठी खर्चाची तरतूद, १८२२ साली मुंबई प्रांतासाठी स्थापन झालेली 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' यामध्येही उच्चवर्णियांचीच मक्तेदारी राहिली. १८५४ सालचा वुडचा खलिता आणि १८८२ साली हंटर कमिशनच्या शिफारशीनंतर मागावर्गीयांच्या शैक्षणिक परिस्थितीमध्ये फारसे बदल झाले नाहीत.

शैक्षणिक सुधारणा होत असतानाही मागावर्गियांच्या शिक्षणासाठी ज्या ऐतद्देशियांनी प्रयत्न केले त्यामध्येही म.फुलेंचे स्थान अग्रस्थानी रहाते. बहुजन समाजाच्या दु:खाच्या कारणमिमांसेत 'अविद्या' हे एकमेव कारण या अवनितीसाठी त्यांनी दिले. त्यामुळेच महार, मांग व स्त्रीयांना शिक्षण देणेसाठी त्यांनी शाळांची सुरुवात केली. त्यांची हंटर आयोगापुढील साक्ष ही मागासवर्गियांच्या शिक्षणाबाबत सरकारच्या डोळयात अंजन घालणारी ठरली.म.जोतिबा फुलेंच्या वैचारिक मांडणीवरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर

यांची मागावर्गियांच्या शैक्षणिक विचारांची पायाभरणी झाली.

महात्मा फुलेंच्या मार्गावरच अस्पृश्यांच्या साठी प्रयत्न करणारे गोपालबुवा वलंगकर (मृत्यू १९००) हे अस्पृश्यवर्गातील पहिले नेतृत्व होते. ब्रिटीश सैन्यात नोकरी करताना मिळालेल्या शिक्षणामुळे अस्पृश्यता निवारणासाठी 'अनार्यदोषपरिहार समाज' स्थापन करुन त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांना सुधारक आणि दीनबंधू मधून वाचा फोडली. त्यामुळे म.फुलेंच्या विचारांनी प्रभावित होऊन कार्य करणारे गोपाळबुवा वलंगकर यांना आंबेडकरी विचार प्रवाहापूर्वीचा मैलाचा दगड म्हणून स्थान देणे क्रमप्राप्त ठरते.

शिवराम जानबा कांबळे (१८७५ जन्म) हे आंबेडकर पूर्व मागासवर्गियांच्या उन्नतीचे विचार मांडणारे दुसरे मागासवर्गिय नेतृत्व होते. कोल्हापूरच्या मराठा दीनबंधू मध्ये ऑक्टोबर १९०२ मध्ये लेख लिहून पहिल्यांदा अस्पृश्य मुलामुलींचे शिक्षण ही सरकारचीच जबाबदारी आहे असे परखड मत त्यांनी मांडले. अस्पृश्यांच्या सभेतून किंवा 'सोमवंशीय मित्र' या मासिकातून अस्पृश्यवर्गाच्या शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली.

अस्पृश्योद्धाराचे काम जीवन ध्येय म्हणून स्वीकारुन तळागाळातील लोकांच्या उन्नतीसाठी मिशनरी धर्तीवर डिप्रेस्ड क्लासेस मिशन ऑफ सोसायटीच्या माध्यमातून काम करणारे विठ्ठल रामजी शिंदे हे असामान्य नेतृत्व होते. छ.शाहूंनी महार वतन रयतावा, मागासवर्गियांसाठी ५० टक्के आरक्षण यासारखे कायदे अस्पृश्योद्धारासाठी कोल्हापूर संस्थानात केले. कारण वेदोक्त प्रकरणाच्या झटक्याने त्यांची अस्मिता जागी झाली. आपल्या कारकिर्दीत सर्व जातीधर्मांच्या विद्यार्थ्यांच्या, शिक्षणासाठी त्यांनी वसतिगृहे तर काढलीच पण १९०८ मध्ये 'मिस क्लार्क' हे तर अस्पृश्यांच्या मुलांसाठी काढलेले भारतातील पहिले वसतिगृह होते.त्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कर्मवीरांनी ज्ञानाची गंगोत्री पददलित समाजाच्या दारात पोहचविली. महात्मा फुले ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या वैचारिक पार्श्वभूमीवरच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पददलितांच्या शैक्षणिक

उन्नतीसाठीच्या आपल्या विचारांची बैठक तयार केली.

१९ व्या शतकाच्या शेवटी अस्पृश्य समाज, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक बंधनामुळे स्पृश्य समाजाच्या तुलनेत शेकडो वर्षे मागास राहिला. अशा समाजात १४ एप्रिल १८९१ साली डॉ.आंबेडकरांचा जन्म झाला. अस्पृश्यतेच्या विषारी दंशाची जाणीव दैनंदिन जीवनातच त्यांना सोसावी लागली. स्पृश्य समाजाच्या बरोबर आपण जगू शकत नाही, शाळेत वेगळे बसविण्यात येते, शिक्षक जवळ येत नाहीत या साऱ्यांच्या मुळाशी भारतीय समाजातील विषमता आहे. याची जाणीव शिक्षण घेत असतानाच त्यांना झाली. आजवर अस्पृश्यातील कोणालाच या विरुद्ध बंड करुन उठावे असे वाटले नव्हते, पण डॉ.आंबेडकरांच्या मनात दिवसेंदिवस या बंडखोरीची बिजे रुजू लागली. कॉलेजच्या शिक्षणावेळीच शिवराम जानबा कांबळे , विठ्ठल रामजी शिंदे, नारायण चंदावरकर,गोपाळबुवा वलंगकर, छ.शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड यांच्या कार्यातून त्यांच्या विचारांची बैठक दृढ होत गेली. अमेरिका व इंग्लंड येथील शिक्षणासाठी केलेल्या वास्तव्यामुळे भारतीय व पाश्चात्य समाजातील फरक त्यांच्या लक्षात आला. भारतातील व्यापार,भारतीय अर्थव्यवस्थेचा सूक्ष्म अभ्यास यातून वर्णव्यवस्था, अर्थव्यवस्था व समाजजीवन या विषयीची त्यांची मते भक्कम बनत गेली. यातूनच शिक्षण नसल्यामुळे मानसिकदृष्ट्या गुलाम, सांस्कृतिक दृष्ट्या पंगू आणि आर्थिकदृष्ट्या दरिद्री बनलेल्या जाती बांधवांच्या उत्थापनासाठी त्यांनी आपले जीवन खर्च करण्याचे ठरविले. म.फुले आणि त्यांचा वारसा घेऊन कार्य करणाऱ्या छ.शाहू महाराजांनी डॉ.आंबेडकरांच्यातील नेतृत्व गुण ओळखून त्यांच्याकडे १९२० मध्ये त्यांच्या जातीचे नेतृत्व माणगांव परिषदेच्या माध्यमातून देऊ केले. शिक्षण संपवून डॉ.आंबेडकरांनी समाज कार्यामध्ये प्रत्यक्ष सहभागाला सुरुवात केली होती. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही त्यामुळेच प्राथमिक शिक्षण हेच मागासवर्गियांच्या उन्नतीच्या प्रयत्नांची पहिली पायरी आहे हे ओळखले.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या नेतृत्वाने १९२० सालापर्यंत सामाजिक चळवळींना महत्व न देता राजकीय विचारांच्यावर भिस्त ठेवली होती, स्वातंत्र्याचीच मागणी केली. १९१९ च्या कायद्यानंतर शिक्षण सोपीव खात्यामुळे प्रांतांच्या अखत्यारीत आले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व सार्वत्रिक व्हावे ही मागणी जोर धरु लागली होती. सहशिक्षण असावे की नसावे यामध्ये शिक्षण तज्ञ गुंतले होते. यावेळी मागासवर्गियांच्या परिवर्तनातील शिक्षण हा मोठा गतीरोधक आहे. या जाणीवेने दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाच्या 'माणगांव' येथील परिषदेत फार मोठे वैचारिक मुद्दे व ठराव डॉ.आंबेडकरांनी पास करुन घेतले. त्यामध्ये ठराव नंबर ५ ते ८ स्पृश्य-अस्पृश्यांच्या शाळा एकत्र असाव्यात, बहिष्कृत वर्गातील मुलांना शिष्यवृत्या मिळाव्यात , प्राथमिक शिक्षणात मुलामुलींचा भेद न करता, शक्य तितक्या लवकर सक्तीचे व मोफत शिक्षण मिळावे व त्यासाठी शाळा मास्तर आणि सर्व शैक्षणिक नोकरशाही बहिष्कृत वर्गाचे हितेच्छू असावेत. मागासवर्गीय शिक्षक ट्रेंड करावेत तरच मागासवर्गीयांच्या शिक्षणाला सुरुवात होईल असे मौलिक विचार त्यांनी मांडले.

शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी नेमलेल्या सर नारायणराव चंदावरकर यांच्या नेतृत्वाखाली १९२१ मध्ये नेमलेल्या कमिटीमध्ये अतिशय मार्मिक सूचना केल्या. त्यामध्ये शिक्षणाचा दहा वर्षाचा नियोजनबद्ध कार्यक्रम आखून त्यासाठी लोकांवरती कर बसवून शिक्षणखर्च भागवावा. पण सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष करु नये असे मत मांडले. १९२३ मध्ये प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी प्रांतिक शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थाकडे हस्तांतरीत केली. त्यावेळी दलितांच्या शिक्षणावर भाष्य करताना डॉ.आंबेडकरांनी मुंबई प्रांतातील लोकसंख्या व शिक्षणाचे प्रमाण याविषयी आकडेवारीने आपली मते मांडली. त्यामध्ये ते म्हणतात 'दलित वर्ग लोकसंख्येच्या दृष्टीने प्रांतात दुसरा आहे. पण प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणात तो सर्वात खाली म्हणजे चतुर्थ स्थानावर आहे.पण उच्चवर्गिय लोकसंख्येने चौथ्या क्रमांकावर असून सर्व प्रकारच्या

शिक्षणात मात्र प्रथम आहेत.' मागासवर्गीय समाजाच्या शैक्षणिक आकडेवारीवरुन सरकार मागावर्गीयांच्या शिक्षणात उदासिन आहे हे त्यांनी दाखवून दिले. यावर उपाय म्हणून त्यांनी २० जुलै १९२४ रोजी सेक्रेटरी सि.ना.शिवतरकर व निवृत्ती तुळसीराम जाधव व स्वत:, बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून १९२७ मध्ये मुंबई विधान मंडळामध्ये मांडलेल्या 'शिक्षण अनुदान विधेयकावर' भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केले की प्राथमिक शाळेत प्रवेश घेतलेल्या १०० मुलांपैकी १८ मुले चौथ्या वर्गात जातात. ८२ मुले पुढील शिक्षणापासून वंचित रहातात. यामध्ये मागावर्गीयांचे प्रमाण सर्वांत जास्त आहे. ही शिक्षणातील विषमता मागासवर्गीयांच्या मागासलेपणाचे एकमेव कारण आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षणावर अतिरिक्त खर्च केला गेला पाहिजे. या विचारावर सरकारची कानउघडणी करण्यास ते डगमगले नाहीत. कारण भारतातील नेतृत्व त्यावेळी राजकीय सुधारणासाठी आग्रही असले तरी येणाऱ्या सुधारणा व राजकीय हक्क हे उच्चवर्णियांच्याच हाती पडणार होते. त्यास डॉ.आंबेडकरांचा पूर्ण विरोध होता. त्यामुळे मागासवर्गियांना शिक्षण देऊन त्यांना उच्चवर्णियांच्या बरोबरीने आणले तरच मिळणारे राजकीय हक्क उपभोगण्यास समर्थ होतील. या विचारावर डॉ.आंबेडकर ठाम होते. त्यामुळेच शिक्षणाच्या शर्यतीत धावणाऱ्या स्पृश्य व अस्पृश्यांच्यात एवढे अंतर पडले आहे की मागासलेल्या गाढ निद्रेत घोरत पडलेल्या अस्पृश्य वर्गाने खडबडून जागे होऊन प्रगतीच्या शर्यतीत स्पृश्यांना कसे मागे टाकावे या विचारात ते गुंतलेले होते. यासाठी मागासवर्गियांना स्वतंत्रशाळा, खास सवलती दिल्याच पाहिजेत या मताशी ते ठाम राहीले.त्यामुळेच मागासवर्गिय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी शासनाने अंदाजपत्रकात तरतूद केली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

डॉ.परांजपे हे शिक्षणमंत्री असताना त्यांच्या शिक्षण, स्थानिक स्वराज्य संस्थांच्याकडे सुपुर्द करण्याच्या धोरणावर टीका करताना डॉ.आंबेडकरांना असे वाटत होते की, अस्पृश्यांना शिक्षण मिळणे दुरापास्तच होईल. कारण ज्यांना शिक्षणाविषयी कोणतीही जाण नाही,

आस्था नाही, जे स्वत: अशिक्षित आहेत अशा स्थानिक स्वराज संस्थांच्या प्रतिनिधींच्या हाती ही जबाबदारी टाकून सरकारने अस्पृश्यांची कधीही भरुन न येणारी हानी केली आहे. म्हणजेच मागावर्गियांच्या धोरणाविरुद्ध तयार केलेले कायदे बदलण्याचे अधिकार जनतेकडे असले पाहिजेत हा विचार डॉ.आंबेडकरांनी मांडलेला दिसतो. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार हा राष्ट्रीय प्रगतीचा पाया आहे. तो स्थानिक लोकांच्या खुशीवर सोपविल्यास शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारास कैक शतके वाट पहावी लागेल. हा मुलभूत विचार शैक्षणिक क्षेत्रात डॉ.आंबेडकरांनी मांडला. स्वतंत्र भारतात आजही निरक्षरतेचे प्रमाण कमी झाले नाही. याचे एकमेव कारण म्हणजे आजही प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे आहे व ती त्यांना समर्थपणे पेलता आली नाही. त्यामुळेच भारतातील अनेक राज्यामध्ये संपूर्ण साक्षरता झाली नाही, हे मान्य करावेच लागते. म्हणूनच डॉ.आंबेडकरांनी मागासवर्गियांच्या शिक्षणाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यातून कोणतीच चालना मिळणार नाही हे स्पष्ट केले आहे.

१९२० ते २७ या कालखंडामधील मागासवर्गियांच्या शिक्षणाचा आलेखच पुढे ठेवून त्यांनी महात्मा गांधी सारख्या राष्ट्रीय नेतृत्वाचे लक्ष मागासवर्गियांच्या प्रश्नाकडे वळविले. हरिजन वृत्तपत्रांतून म. गांधीनी मांडलेली मते याची निदर्शक आहेत.फक्त दलितांच्या शिक्षणाविषयी डॉ. आंबेडकर विचार मांडून थांबत नाहीत तर त्यावरती उपाययोजना म्हणून सक्तीच्या शिक्षणाचा कायदा, शिक्षणाच्या कारभाराचे हस्तांतर, प्राथमिक शाळातील कायद्यांचे सक्तीचे पालन व दलितांना प्रोत्साहन हे उपाय सुचवितात. दारुबंदीपेक्षा सार्वत्रिक शिक्षण प्रथम प्राधान्याने द्यावे. कारण त्यामुळेच दारुबंदीला सहज आळा घालता येईल असे मतही ते स्पष्टपणे नमूद करतात. अस्पृश्य विद्यार्थ्यांची शाळेबाहेर बसवून कशी गैरसोय केली जाते याचे गावागावातील आकडेवारी ते समाजापुढे टाकताना कचरत नाहीत.

या सर्वांसाठी बहिष्कृत हितकारिणी सभा विसर्जित करण्याचा ठराव १९२८ मध्ये

मांडून बहिष्कृत शिक्षण प्रसारक मंडळ काढले व दलित विद्यार्थ्यांसाठी छात्रालये उघडण्याचे कार्य सुरु केले. यातूनच त्यांनी मागासवर्गीयांच्यासाठी स्वतंत्र संस्था उघडणे हा एकमेव मार्ग आहे. याची जाणिव करुन दिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मागासवर्गियांच्या राजकीय हक्क प्राप्त करुन देण्याच्या कामाला जितके प्राधान्य दिले, तितक्याच बारकाईने अस्पृश्यांच्या शिक्षणावर आपले स्पष्ट मत मांडले. १९१३ मध्ये शिक्षण घेत असताना स्त्रि शिक्षण किती महत्वाचे आहे. या विषयी आपल्या वडिलांचे मित्र श्री. जमेदार यांना पत्र पाठवतात. तसेच शिक्षणासंबंधी शिक्षण अनुदान विधेयकावरील चर्चा, विविध परिषदामधील त्यांची भाषणे, ठराव, वृत्तपत्रीय लेखन,भारतीय संवैधानिक आयोगापुढील कैफियत यातून त्यांच्या मागासवर्गियां विषयक शैक्षणिक विचारांची दिशा स्पष्ट होते. मागासवर्गिय मुले माध्यमिक शिक्षणापासून परावृत्त होतात. कारण मुलांना शाळेत पाठविणे म्हणजे येणारी कमाई बंद करुन त्यांच्या शिक्षणावर खर्च करणे हे परवडणारे नाही. त्यामुळे माध्यमिक शिक्षणासाठी फी द्वारे वसूल केला जाणारा खर्च थांबवावा तरच मागासावर्गीयांना शिक्षण घेणे शक्य आहे.अशी स्पष्ट सूचना ते शिक्षण खात्याला करतात. कारण त्यामागे मागासवर्गिय माध्यमिक शिक्षणापर्यंत पोहचले तरच त्याची प्रगती होईल असे त्यांना वाटते.

१९२४ मुंबई शासनाने मुंबई विद्यापीठ सुधारणा कायदा करण्यासाठी विद्यापीठ विषयक प्रश्नांचे अध्ययन करुन अहवाल सादर करण्यासाठी सुधार समिती स्थापन केली. त्यांच्या प्रश्नावलीला उत्तर देताना डॉ.आंबेडकरांनी मुंबई विद्यापीठ शिक्षण यंत्रणेतील उणिवा, विविध जाती-जमातीतील सांस्कृतिक आदान प्रदान, संशोधन क्षेत्रातील योगदान, विशिष्ट जाती-जमातीतील शिक्षण प्रसारातील करावयाच्या योजना याकडे लक्ष वेधले.जो पर्यंत विद्यापीठाच्या सिनेट मध्ये दलितांना प्राधान्य मिळणार नाही तोपर्यंत या वर्गाच्या हिताचे संरक्षण होणे अशक्यच आहे. उच्चशिक्षण घेऊन प्रशासन, शिक्षण क्षेत्रात मोक्याच्या जागा मिळवाव्यात हा मंत्र त्यांनी दिला आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

डॉ.आंबेडकर मुंबई विद्यापीठ सुधारणा संबंधी ते लिहीतात की, " विद्यापीठे कशी असू नयेत याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुंबई विद्यापीठ." असे म्हणण्याचे कारण म्हणजे त्यांचे सर्व उच्च शिक्षण केंब्रिज, ऑक्सफर्ड या पाश्चात्य विद्यापीठांमधून झाले होते. भारतीय विद्यापीठांमध्ये जी असमानता आहे तशी असमानता त्या विद्यापीठामध्ये नव्हती. म्हणूनच ती विद्यापीठे जगात नामांकित आहेत.त्या धर्तीवर मुंबई विद्यापीठाने सुधारणा कराव्यात व शिक्षणात समतेचे तत्व लागू करावे हा मौलिक सल्ला या टिके मधून त्यांनी दिला.

उच्चशिक्षणा इतकेच तंत्रशिक्षण महत्वाचे आहे, पण ते दलितांच्या आर्थिक क्षमतेपलिकडचे आहे. पण पुस्तकी शिक्षणाबरोबरच प्रगतीसाठी तंत्रशिक्षण अत्यंत गरजेचे आहे तरच अनुसूचित जातींची प्रगती होवू शकेल असे त्यांना वाटते.

अस्पृश्य व स्त्रिजात द्वेषमुलक राजकारण व समाजकारणाने भारताना ग्रासले आहे. त्यामुळे डॉ.आंबेडकरांनी मुलांइतकेच मुलींच्या शिक्षणाचा गांभीर्याने विचार केला आहे. १९२७ साली महाड सत्याग्रहाच्या वेळी स्त्रियांनी जात दर्शक अभूषणे, टाकून द्यावीत व चळवळीत सामील व्हावे असे म्हणणारे डॉ.आंबेडकर १९४२ च्या दलित महिला परिषदेला सांगतात. तुमच्या मुलांना शिक्षण द्या. त्यांच्या महात्वाकांक्षा जागृत करा. हीनगंड नाहिसा करा, गुलामासारखे राहण्यास नकार द्या. व समतेचा आग्रह करा. हे त्यांच्या स्त्रिविषयक विचारातील फार मोठे परिवर्तन होते. स्वतंत्र भारतातील दलित स्त्री सर्वांच्या बरोबरीची असली पाहिजे. हा विचार त्यांना प्रकर्षाने जाणवत होता. त्यासाठी त्यांनी दलित स्त्रिशिक्षित झाली पाहिजे यावर भर दिला. उच्च वर्णिय तरुणांशी लग्न करुन आपल्या समाजातील शिक्षित स्त्री दुसऱ्या वर्गात जाऊ नये असे त्यांना वाटत होते. कारण अधिच दलित वर्गात शिकलेल्या स्त्रीयां कमी व त्यात त्यांनी उच्चवर्गीय मुलांशी लग्ने केली तर त्यांच्या शिक्षणाचा दलित समाजाला फायदा न होता. तो पुन्हा उच्चवर्णियांना होईल असे त्यांना वाटत होते.

मागासवर्गिय समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी वसतिगृहांची प्रकर्षाने गरज आहे हे त्यांनी ओळखल्याने बहिष्कृत हितकारिणी सभेच्या उद्दीष्टामध्ये मागासवर्गिय समाजामध्ये शैक्षणिक प्रसारासाठी वसतिगृहे स्थापन करणे याचा समावेश केला होता. यासाठी वसतिगृहांची चळवळ मोठ्या जोमांनी त्यांनी व त्यांचे सहकारी दादासाहेब गायकवाड, बी.एच.वराळे, श्री.दोंदे यांनी सुरु केली. छ. शाहू महाराजांच्या वसतिगृहांच्या चळवळीचा फायदा बहुजन समाजाला मोठ्या प्रमाणात झाला होता. म्हणूनच त्यांनीही सोलापूर, धारवाड,मनमाड या भागामध्ये वसतिगृहे स्थापन केली.

शिक्षणविधेयक अनुदानावरती चर्चा करताना ते म्हणतात मागासवर्गिय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपेक्षा वसतिगृहांची गरज आहे असे ठासून सांगितले. मनमाडच्या वसतिगृहांच्या बोर्डवरती लिहिले होते. ''दलितांना विद्यादान देऊ राष्ट्राचे ऋण फेडा'' थोडक्यात भारतीय जनतेने दलितांच्या शिक्षणाकडे राष्ट्रीय काम आहे म्हणून पहिल्यासच समता प्रस्थापित होवू शकते असे त्यांना वाटते.त्याचबरोबर वसतिगृहाच्या निर्मितीशिवाय मागासवर्गिय मुलांना शिक्षण घेणे परवडणारे नाही असा अशी खंत ही ते वेळोवेळी व्यक्त करीत असत. त्यांनी सुरु केलेल्या अस्पृश्यांच्या वसतिगृहांच्या चळवळीमुळे ग्रामीण भागातील पददलित समाजातील मुले शिक्षण घेऊ शकली त्यामुळे आज भारतभर मोठ्या पदावरती कार्यरत झाल्याचे दिसते.

सरकारी शाळा,उच्च वर्णियांच्या शिक्षणसंस्था यातून शिकण्याची मानसिकता दलित समाजात मोठ्या प्रमाणात तयार झाली नव्हती. डॉ. आंबेडकरांनी वेळोवेळी केलेली भाषणे, वृत्तपत्रे यातून दलितांनी शिक्षणाकडे वळावे याबद्दल सांगूनही दलित समाज शिक्षणाकडे झपाट्याने वळत नव्हता. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्यावर असलेल्या धर्मबंधनाचे जोखड, उदासिनता व अंधश्रद्धा हे होते.याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. त्यामुळे बहिष्कृत हितकारणी सभा त्यानंतर बहिष्कृत समाज शिक्षण प्रसार मंडळ यांची सुरुवात करुन दलितांसाठी स्वतंत्र शिक्षणसंस्था चालविण्याचा संकल्प

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सोडला. डॉ. आंबेडकरांनी फक्त संकल्पच सोडला नाही. तर ८ जुलै १९४५ रोजी मुंबई मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. आणि या संस्थेमार्फत सिध्दार्थ कला आणि शास्त्र महाविद्यालयाची स्थापना केली. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची एका वेगळ्या ध्येय धोरणांनी उभारणी केली. या संस्थेच्या उभारणीमध्ये एन. शिवराज, जे. एच. सुबय्या, श्री. आर. आर. भोळे, श्री. जी. टी. मेश्राम, सी. के. बोले, बॅ. समर्थ, श्री. दोदे या सारख्या विविध जातीतील लोकांनी सहकार्य केले. यावरून एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व जाती जमातींच्या व्यक्तींना आपल्या शैक्षणिक कार्यामध्ये सामावून घेतले. महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांपुढे डॉ. आंबेडकरांनी गौतम बुध्द, मिलींद यांच्या सारख्या तत्ववेत्यांचा आदर्श ठेवला.

सत्य शोधून काढणे व जो धर्म आपल्याला मानवता शिकविल त्या धर्माचे अनुसरून करणे या विचारांवर विद्यार्थ्यांची जडण घडण व्हावी अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा होती. या महाविद्यालयात सुरू केलेली मंडळे ही विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या बौध्दीक विकासासाठी अत्यंत महत्वाची होती. इंग्रजी साहित्य मंडळ, मराठी वाड:मय मंडळ, हिंदी साहित्य मंडळ, इतिहास मंडळ, विद्यार्थी संगीत मंडळ यातून सर्व विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना वाव देण्यात आला. विद्यार्थी विकास केंद्र बिंदू मानून शिक्षण मिळावे हा मूलगामी हेतू डॉ. आंबेडकरांचा होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे उदयाचा भारत या शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या हाती जाणार आहे. तेव्हा त्याचे रक्षण, विकास योग्य दिशेने झाला पाहीजे म्हणून विद्यार्थ्यांच्या विकासावरती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विशेष लक्ष दिले. एकंदरीत मागास वर्गीय आणि उच्च वर्गीय समाजाला पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

दिलेली फार मोठी देणगी आहे.

पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यामधून बाहेर पडणारा विद्यार्थी हा तज्ञ, सामाजिक समता प्रस्थापित करणारा भारतीय विकासाच्या जडणघडणीमध्ये तो योगदान देणारा असला पाहिजे ही अपेक्षा डॉ.आंबेडकरांची असल्याने त्यांनी या विद्यार्थ्यांना घडविणारा प्राध्यापक वर्ग ही तितक्याच क्षमतेचा नेमला.त्यामध्ये सिद्धार्थ कॉलेजचे पहिले प्राचार्य गजेंद्रगडकर,सुप्रसिद्ध मराठीलेखक अनंत काणेकर,प्रा.मधु दंडवते, फ्रँक डिसूझा यांचा प्रामुख्याने समावेश होता.

नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिक्षण घेता यावे म्हणून सकाळचे महाविद्यालय सुरु केले. हा एक नवोपक्रम होता. सिद्ध संशोधन पत्रिका सारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती जोपासावी की जी पुढे या देशाला उपयोगी ठरेल. ही दूरदृष्टी डॉ.आंबेडकरांची दिसून येते. विद्यार्थ्यांच्या बौद्धीक विकासाबरोबरच शारिरीक विकास होणे तितकेच महत्वाचे असलेने महाविद्यालयामध्ये त्रिविध प्रकारचे खेळ सुरु केले. व खेळांडूना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष पारितोषिके दिली गेली. ही पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयांची काही ठळक वैशिष्टये होती.

सिद्धार्थ कॉलेजने सुरु केलेले नवोपक्रमामुळे कला,क्रीडा इ. क्षेत्रात कॉलेजने नेत्रदिपक प्रगती केली. यामुळे या कॉलेजची किर्ती भारतभर पसरली. की ज्यामुळे या कॉलेजला देशातील अनेक नामवंत मान्यवरांनी भेटी दिल्या. त्यामध्ये लेडी माऊंट बॅटन, सी.पी. आणी बरेर, मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री बाळासाहेब खेर,चिमणलाल सेटलवार,आंतरराष्ट्रीय किर्तीचे शास्त्रज्ञ सी.व्ही.रमण,जयप्रकाश नारायण,प्र.के.अत्रे, हे मान्यवर असून त्यांनी कॉलेजचे कौतुकही केले. राष्ट्र विकासासाठी महाविद्यालयाचे योगदान ही तितकेच महत्वाचे असते. याची जाणीव डॉ.आंबेडकरांनी महाविद्यालयात झालेल्या विविध कार्यक्रमाच्यावेळी विद्यार्थी व प्राध्यापकांना करुन दिलेली असलेने त्याच विचाराने पुढे गेलेल्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी देशाच्या प्रशासन, शिक्षण व

राजकारणातील मोठी पदे मिळविली. या महाविद्यालयाचे प्राध्यापक मधु दंडवते पुढे खासदार व भारत सरकारचे रेल्वेमंत्री, अर्थमंत्री झाले.प्रा.अरुण दोंदे पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष व विधानपरिषदेचे सदस्य बनले. दादासाहेब रुपवते, रामदास आठवले,एन.एम.कांबळे हे महाराष्ट्राचे समाजकल्याण मंत्री बनले, जी.डी.जाधव,आय.ए..एस. झाले. पी.बी.सावंत सुप्रीम कोर्टाचे न्यायाधिश बनले.

सुधारलेल्या मुंबई बरोबरच शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या हैद्राबाद संस्थानच्या हद्दीत असणाऱ्या औरंगाबाद शहरात १९५० मध्ये डॉ. आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालय सुरु केले. सिद्धार्थ कॉलेजप्रमाणेच मिलिंद महाविद्यालयामध्येही नामांकित प्राध्यापकांची नेमणूक करुन तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षणात उच्चवर्णियांच्या बरोबरीने आणण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी केले. डॉ.आंबेडकरांच्या महानिवार्णानंतरही या संस्थेने आपला विस्तार मुंबई, औरंगाबाद,महाड,वडाळा,दापोली या ठिकाणी केला.

उच्चवर्णियांनी चालविलेल्या शिक्षण संस्थातून बरोबरीच्या नात्याने दलित विद्यार्थी आपली प्रगती करुन घेऊ इच्छित नव्हते. याची जाणीव झाल्याने डॉ.आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. त्यामध्ये दलितेत्तर मुले-मुली सुद्धा शिकू शकली १९२० च्या दरम्यान शिक्षण घेणे दुरापास्त असणाऱ्या समाजाच्या शिक्षणासाठी १९४५ मध्ये स्वतंत्र संस्था काढून आधुनिक भारताच्या परिवर्तनाची फार मोठी स्वप्रे रंगवून डॉ.आंबेडकरांनी ही स्वप्रे प्रत्यक्षात उतरविल्याचे दिसून येते. या अर्थाने पीपल्स एज्युकेशन सोसायटी डॉ.आंबेडकरांचे जीवंत स्मारक मानावेच लागते. फक्त विचार मांडूनच ते गप्प बसले नाहीत तर शक्य त्या संधीचा फायदा घेवून मागासवर्गीयांना शिक्षणाचे द्वार मुक्त करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वातंत्र्योत्तर भारताच्या निर्मितीचे प्रेरणास्थान ठरतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे १९३५च्या घटनात्मक सुधारणानंतर मुंबई विधानसभेवर सदस्य म्हणून नियुक्त झाले.त्यामुळे राजकारण,घटना निर्मिती व इतर अनेक कार्यात गुंतल्यामुळे वैचारिक व विहित कार्य साध्य करण्यासाठी त्यांना सुशिक्षित व

समाजपरिवर्तनाची जाणीव असणाऱ्या सहकाऱ्यांची गरज होती.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक असे असामान्य व्यक्तिमत्व होते की त्यांच्या कार्यामध्ये मदत करणाऱ्या निष्ठावान सहकाऱ्यांची शृंखलाच तयार केली.त्यांच्यावर निष्ठा ठेवणारे आणि सक्रीय मदत करुन त्यांचे कार्य पुढील टप्प्यात पोहविणारे अनेक सहकारी समर्थपणे त्यांच्या मदतीस आले. त्यामुळेच त्यांनी अल्पावधीत फार मोठी गरुडझेप मागासवर्गीयांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये त्यांनी घेतली.

त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये फक्त मागासवर्गीयच नेतृत्व नव्हते तर सर्व जाती धर्माच्या सहकाऱ्यांना त्यांनी आपल्या वर्तुळात सामील करुन घेतले.श्री.डी.जी. जाधव, रावबहाद्दूर भोळे, न्यायमूर्ती आर.आर.भोळे, बॅ.एम.बी.समर्थ, प्रोफेसर व्ही.जी.राव, आर.डी. कोवळी,प्राचार्य एम.बी.चिटणीस,घनश्याम तळवटकर, एस.जी.टिपणीस, यशवंतराव उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर, डॉ.पी.टी.बोराळे,प्रा.अनंत काणेकर,श्री.बी.एच. वराळे,गंथपाल एस.एस.रेगे.यांचा उल्लेख महत्वाचा ठरतो. त्यांच्या सहकार्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सदस्य ,उपाध्यक्षपद, अध्यक्षपद,व्यवस्थापकीय कार्य सांभाळले व प्रगतीपथावर नेले. पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे विस्तारीत महाविद्यालये सांभाळणे हे तितकेच सोपे काम नव्हते. तरीही अनुसूचित जातीमधील डी.जी.जाधवच्या पहिल्या फळीतील कार्यकर्त्यांना डॉ.आंबेडकरांनी आपणाकडे बोलावून घेतले शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांचे सर्व सहकारी कामगार चळवळी, स्वतंत्र मजूर पक्ष यांच्या कार्यात ही समर्थपणे मदत करीत होते.

इतर भागातील कर्तत्ववान सहकार्याकडे डॉ.आंबेडकरांनी आपण निर्माण केलेल्या संस्था सोपविल्या. त्यामध्ये निपाणीच्या बी.एच.वराळे यांच्याकडे निपाणी भागातील शैक्षणिक विकासाची जबाबदारी टाकली. मिलिंद महाविद्यालयाच्या रजिस्ट्रार पदावरुन निवृत्त झाल्यावर निपाणीसारख्या मागासलेल्या भागात शैक्षणिक विचार पेरणारे नेतृत्व त्यांनी दिले तसेच दादासाहेब गायकवाड यांच्याकडे विदर्भ तर श्री. दोंदे एम.बी.चिटणीस

यांच्यावरती मुंबईची जबाबदारी सोपविली आणि शैक्षणिक प्रसाराला मोठ्या प्रमाणात चालना दिली. त्यांना माहीत होते की, शैक्षणिक कार्य हे एकट्या व्यक्तीमुळे पूर्णत्वाला जाणार नाही त्यासाठी अनेक सहकाऱ्यांची मदत घ्यावी लागणार होती. पण आजची परिस्थिती पाहिली तर जो एखाद्या चळवळीचा प्रमुख असतो तो इतर आपल्या कार्यकर्त्यांना पुढे आणण्यास कचरत असतो. किंबहूना त्यांना संधी पासून परावृत्त ठेवतो पण डॉ. आंबेडकरांच्या मध्ये एक असामान्य गुण जाणवतो तो म्हणजे शैक्षणिक कार्य करीत असताना अनेक सहकाऱ्यांना बोलावून संधी दिली व त्यातून सहकाऱ्यांचीही जडणघडण झाली. त्यामुळेच पुढील काळात पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा डोलारा समर्थपणे सांभाळण्यास ते तयार झाले.

शैक्षणिक विचारांच्या प्रचार आणि प्रसारासाठी कार्यकर्ते, सहकारी जितके महत्वाचे असतात,तितक्याच प्रमाणात वृत्तपत्रांसारख्या माध्यमाचीही गरज आहे याची जाणीव डॉ.आंबेडकरांना असल्यामुळे त्यांनी स्वत:ची वृत्तपत्रे सुरु केली. १९ व्या शतकामध्ये आणि २० व्या शतकाऱ्या दुसऱ्या दशकापर्यंत महात्मा फुलेंचा दीनबंधू किंवा सुधारक, सोमवंशीय या सारखी वृत्तपत्रे सोडली तर सर्वच वृत्तपत्रेही ब्राह्मणी विचारधारेवरती आधारलेली होती. या वृत्तपत्रामधून मागासवर्गियांच्या हक्क अधिकाऱ्यांचा प्रश्न त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न, समतेचे तत्व कधीही ऐरणीवरती आणले नाही.त्यामुळे डॉ.आंबेडकरांना मागासवर्गीयांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी स्वत:चीच वृत्तपत्रे असली पाहिजेत याची निकड भासू लागली आणि या गरजेतूनच मूकनायक हे वृत्तपत्र १९२० साली सुरु केले.

मूकनायकमधून सामाजिक ,धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक विचार मांडले गेले. या वृत्तपत्राच्या पहिल्या अंकातच त्यांनी हिंदू समाज म्हणजे विषमतेचे माहेर घर आहे अशी कडकडीत टीका केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे हा महत्वाचा विचार त्यांनी या वृत्तपत्रामधून प्रसारित केला. त्याचबरोबर अस्पृश्य किंवा मागासवर्गीय समाजानेही शिक्षणापासून दूर राहू नये. आपल्या उन्नतीसाठी शिक्षणाशिवाय

तरणोपाय नाही हा मौलिक सल्लाही त्यांनी मागासवर्गीयांना दिला.

डॉ.आंबेडकर व त्यांचे सहकारी प्रत्येक गावोगावी, वाड्या-वस्ती पर्यंत पोहचू शकत नव्हते. तेव्हा तेथे फक्त वृत्तपत्रेच आपले विचार पोहचवतील असे त्यांना वाटे. त्यांचे विचार वाड्यावस्तीपर्यंत पोहचविण्याचे काम या मूकनायकाने पूर्ण केले. आर्थिक निधी अभावी व पुढील शिक्षणासाठी लंडनला जावे लागल्याने मूकनायक बंद पडले. बहिष्कृतांची चळवळ भक्कम पायावरती उभी करण्यासाठी आणि टीकाकारांच्या टीकेला उत्तर देण्यासाठी वृत्तपत्रांची निकड जाणवू लागली. या जाणीवेतूनच बहिष्कृत भारताचा पहिला अंक ३ एप्रिल १९२७ रोजी निघाला. १५ जुलै १९२७ च्या अंकातील अग्रलेखात डॉ.आंबेडकर म्हणतात, 'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीन होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहील्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो.' हा शिक्षणातील महत्वाचा विचार त्यांनी मांडला. याच अंकात त्यांनी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणातील जातीनिहाय आकडेवारी देवून त्यामधील मागासवर्गीयांचे शिक्षणातील प्रमाण सरकारच्या नजरेस आणून दिले. याबाबत टीका करताना ते अग्रलेखाला नावच असे देतात की, 'आप घरीही बाटा आणि बाप घरीही बाटा' म्हणजे शिक्षणाच्या सर्वच क्षेत्रात उच्चवर्णीयांची मक्तेदारी आहे हे त्यांनी दाखवून दिले. ती मोडणे हेच त्यांच्या जीवीत कार्याचे ध्येय होते. बहिष्कृत भारतामधून शिक्षणाबाबत मौलिक विचार मांडले . डॉ.आंबेडकर म्हणतात, शाळेमध्ये नुसत्या बाराखड्या शिकवायच्या नसतात तर तेथे मुलांची मने सुसंस्कृत करावयाची असतात. योग्य वळण लावावयाचे असते. बहिष्कृत भारतातून सरकारला मागासवर्गीयांच्या शिक्षणाबाबत योग्य ते धोरण घेण्यास किंवा विचार करायला भाग पाडले. जनता आणि प्रबुद्ध भारतातूनही डॉ. आंबेडकरांनी शिक्षणातील महत्वाचे विचार मांडलेले दिसतात.

एकंदरीत त्यांनी मुंबई विधानमंडळमध्ये शिक्षण विषयक विधेयकावरती केलेली चर्चा, संवैधानिक आयोगापुढील त्यांची साक्ष, विविध ठिकाणची भाषणे हे सर्व त्यांच्या

त्या त्या काळातील वृत्तपत्रामधून प्रसिध्द झाल्याने मागासवर्गियांच्या मध्ये एक प्रकारे शैक्षणिक व वैचारिक क्रांतीलाच सुरुवात झाली. शैक्षणिक चळवळ पुढे नेण्यासाठी या वृत्तपत्रांचीही कामगिरी डॉ.आंबेडकरांच्या कार्यात तितकीच महत्वाची ठरते.

शिक्षण नसल्याने शतकानुशतके गुलामीचे जीवन जगणाऱ्या आपल्या जातीबांधवांना एक नविन तत्वज्ञान दिले. ते म्हणजे शोषित-पीडीतांच्या मुक्तीचे तत्वज्ञान. गुलामाने आपल्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे. हे स्वातंत्र्य चळवळीच्या काळात गुलामांना भारतीय उच्चवर्णियांपासून मुक्ती देणारे तत्वज्ञान त्यांनी मांडले. गुलामच स्वत:साठी प्रयत्नशील राहिला पाहिजे. त्यासाठी त्यांना शिक्षणाचे बाळकडू पाजले पाहिजे. हे विचार त्यांनी पारतंत्र्यात असलेल्या भारतीय समाजात दृढ केले म्हणजेच दलित-पददलित मानवाच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवून त्यांना अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढणारे विचार तत्कालीन भारतात क्रांतीकारक ठरले. विचाराला कृतीची जोड नसेल तर ते फलद्रुप होत नाहीत म्हणूनच मागासवर्गीयांच्या स्वतंत्र शिक्षणसंस्था काढून 'शिक्षण, संघटन आणि संघर्ष' हा संदेश त्यांनी नवभारताला दिला. नवभारताच्या समाजनिर्मितीमध्ये त्यांचे शैक्षणिक विचार क्रांतीकारक ठरतात.

आज स्वातंत्र्याच्या ५८ वर्षानंतर मागासवर्गीय पददलित समाजाने शिक्षणाच्या क्षेत्रात आघाडी घेतलेली दिसते. घटनेने दिलेल्या शिक्षण घेण्याच्या अधिकारामुळे आज या समाजाच्या प्रगतीचा स्तर उंचावतो आहे. हा समाज राजकारण, समाजकारण, अर्थकारण व प्रशासन या सर्व क्षेत्रात पुढे येताना दिसतो आहे. या सर्वांचे मुख्य कारण म्हणजे त्यांना मिळालेले शिक्षण होय. आणि म्हणून आज मागासवर्गीय समाजामध्ये होत असलेल्या शैक्षणिक क्रांतीचे सर्वस्वी श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे जाते.